# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

दिनांक 06.12.2018 गुरूवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 04 केसस 04 आरोपींना अटक करून 4,170 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 05 केसस 20 आरोपींना अटक करून 74,055 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 70 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 881 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,52,700 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. प्रतापनगर, बेलतरोडी, अजनी – पोलीस असल्याची बतावणी करून तोतयागीरी करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

**1) प्रतापनगर** – दिनांक 05.12.18 चे 1100 वा चे सुमारास फिर्यादी मधुकर ओमकार काळे, वय 67 वर्ष, रा. 20, दुबे लेआउट, सिता गार्डन लॉन जवळ, जयताळा रोड, नागपूर हे पंजाब नॅशनल बॅंक खामला येथुन पैसे काढुन पायदळ घरी जात असतांना पो.स्टे. प्रतापनगर हद्यीत जयताळा आउटर रिंग रोड अग्नी ले आउट बोर्ड कुरीयर ऑफिसजवळ अंदाजे 35 ते 40 वर्ष वयोगटातील दोन अनोळखी आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस हाक मारून बोलावीले व आम्ही पोलीस आहोत येथे चेकिंग सुरू आहे असे म्हणुन ईशा–याने फिर्यादीचे जवळील सोन्याची अंगठी, सोन्याची चैन व नगदी 7,000 रू असा एकुण 53,000 रू चा मुद्येमाल काढण्यास सांगीतले फिर्यादीने मुद्येमाल काढुन आरोपीचे स्वाधीन केला असता आरोपीतांनी पोलीस असल्याची बतावणी करून ठकबाजी करून मुद्येमाल घेवून निघुन गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. प्रतापनगर येथे सपोउपनि ढोणे, 8317272245 यांनी आरोपीविरूध्द कलम 419,170,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) बेलतरोडी** – दिनांक 05.12.18 चे 1130 ते 1145 वा दरम्यान फिर्यादी संजय दत्तात्रय गुंडावार, वय 65 वर्ष, रा. अग्नीरथ संकुल, श्यामनगर, फ्लॅट नं 405, अमृत लॉनचे मागे, नागपूर हे नातवाला शाळेतुन आणण्याकरिता ॲक्टीव्हा गाडी क्रमांक एमएच/34/एडी/2500 ने गेले असता शाळेला वेळ असल्याने पो.स्टे. बेलतरोडी हद्यीत मनिष नगर रोडवर मिड पॉईट हॉस्पीटल रोडवर कार लींक गॅरेजचे बाजुला चहा पिण्याकरिता थांबले, चहा पित असतांना अज्ञात 03 आरोपीतांनी फिर्यादीला विश्वासात घेवून लबाडीने पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याची चैन, सोन्याच्या 02 अंगठया असा एकुण 37,000 रू चा मुद्येमाल फिर्यादीस खिशातुन रूमाल काढायला सांगुन त्यामध्ये मुद्येमाल ठेवण्यास लावून आरोपीतांनी मुद्येमाल स्वतःकडे ठेवून त्यापैकी फिर्यादीस मोबाईल, पैसे व गाडीची चाबी परत करून तेथुन निघुन गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे पोहवा संजय हुड, 9823364082 यांनी आरोपीतांविरूध्द कलम 420,170,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) बेलतरोडी** – दिनांक 05.12.18 चे 1130 वा चे सुमारास फिर्यादी गिरधर महादेवराव पराते, वय 61 वर्ष, रा. क्वॉर्टर नं 310, फॉर्च्युन अंपायर बिल्डींग शोरूम समोर, बेलतरोडी रोड, नागपूर हे दर्शनाकरीता जात असतांना पो.स्टे. बेलतरोडी हद्यीत श्रीराम डेव्हलपर्स बिल्डींग समोर सप्तगीरी नगर येथे

अनोळखी 03 आरोपीतांनी फिर्यादीला थांबवून विश्वासात घेवून लबाडीने पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याची चैन, सोन्याची अंगठी असा एकुण 55,000 रू चा मुद्येमाल फिर्यादीस खिशातुन रूमाल काढायला सांगुन त्यामध्ये मुद्येमाल ठेवण्यास लावून आरोपीतांनी मुद्येमाल स्वतःकडे ठेवून त्यापैकी फिर्यादीस मोबाईल, पैसे परत करून तेथुन निघुन गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे पोहवा संजय हुड, 9823364082 यांनी आरोपीतांविरूध्द कलम 420,170,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

4) अजनी – दिनांक 05.12.2018 चे 1215 वा ते 1230 वा दरम्यान फिर्यादी पुरूषोत्तम डोमाजी मुन, वय 68 वर्ष, रा. प्लॉट नं. 145 नालंदा नगर, नागपुर हे मित्राचे घरून स्वताचे घरी जात असतांना नालंदा नगर प्लॉट नं. 121 जवळ आंबेडकर नगर टी पॉईन्ट कडुन दुचाकी गाडीवर अंदाजे 35 ते 40 वर्ष वयोगटातील दोन इसम येवुन फिर्यादीस थांबवुन आम्ही पोलीस डिपार्टमेंटचे लोक आहोत असे सांगुन व आय कार्ड दाखवुन आम्ही सी.आय.डी पोलीस असुन गांजाची चेकींग करीत आहोत असे म्हणुन समोरून येणा–या एका इसमाला थांबवुन त्याची बॅग तपासुन त्याची सोन्याची चैन काढायला लावली व फिर्यादीला ही गळयातील चैन व अंगठी असा एकुण 36,000 रू चा मुद्येमाल काढायला लावला व समोरील दुस–या व्यक्तीची सोन्याची चैन रूमालात बांधुन परत केली व फिर्यादीला ही त्यांचे जवळील मुद्येमाल रूमालात बांधुन परत केले. नंतर ते निघुन गेले फिर्यादीने रूमाल उघडुन पाहीले असता सामान दिसुन आले नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे अजनी येथे मपोउपनि एस.यु.मंडवाले, 9763234548 यांनी आरोपीतांविरूध्द कलम 420, 170 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. नंदनवन – विश्वासघात करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 10.08.18 चे 1400 वा चे सुमारास फिर्यादी सय्यद अशरद अब्दुल गफार, वय 30 वर्ष, रा. हसनबाग, बडी मस्जित समोर, नागपूर यांनी आरोपी येरपुडे ज्वेलर्स दुकानाचे मालक रा. अयोध्यानगर, नागपूर यांचेकडे सोन्याचे मंगळसुत्र, अंगठी असा एकुण 40,000 रू चा मुद्येमाल गहाण ठेवला होता. आरोपीने फिर्यादीचा विश्वासघात करून सोन्याचे दागिने घेवून पळून गेला. तसेच इतर लोकांनी सुध्दा आरोपीकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवले असता त्यांचा ही विश्वासघात करून पळून गेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नंदनवन येथे पोउपनि पी.डी. बांबोळे, 8999971934 यांनी आरोपीविरूध्द कलम 406,409 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. कळमना – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 04.12.18 चे 1700 वा ते 1705 वा दरम्यान पो.स्टे. कळमना हद्यीत राहणा–या फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि बाहेर गेली असता परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. बेपत्ता आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. कळमना येथे पोउपनि आनलदास, 7276832708 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. तहसील, इमामवाडा :**

1) तहसील – दिनांक 05.12.18 चे 0430 वा चे सुमारास अंदाजे 65 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. तहसील हद्यीत मेयो हॉस्पीटल गेट समोर मेट्रो पुलाचे खाली बेशुध्द अवस्थेत मिळून आला त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. तहसील येथे पोउपनि ए.जे. चव्हान, 8888856613 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) इमामवाडा – दिनांक 06.12.2018 चे 0445 वा चे सुमारास पो.स्टे इमामवाडा हद्यीत वकील पेठ, मोठया विहीरी जवळ, नागपुर येथे राहणारे मधुकर देवराव गजभिये, वय 62 वर्ष यांनी आपले राहते घरी हॉल जवळील रूम मध्ये सिलींग फॅनला दुपट्टयाचे सहायाने गळफास लावला असता त्यांना खाली उतरवुन उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे इमामवाडा येथे मपोउपनि ए.जी. वानखेडे, 8888110877 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर